# ई - पोलीस पत्रिका

दि २९/०५/२०२४ अनु.क्र.९५

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली /प्रशिक्षण/रजा

## रजा

**०१.पोआअ/पशा-३/वाघमारे -रजा/४९१९/२०२४ अमरावती शहर दिनांक २१/०५/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकातील खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी मध्ये आजाराचे कारणास्तव कर्तव्यावर अनुपस्थित असल्याने त्यांचा रुग्ननिवेदनाचा कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६१ अन्वये परावर्तीत रजा व रजा नियम १९८१ मधील नियम क्रमांक ५० अन्वये अर्जित रजा तसेच सदर कर्मचारी यांच्या रजा खाती रजा शिल्लक नसल्याने म.ना.से.(रजा) नियम १९८१ मधील नियम ६३ (६) तरतुदी प्रमाणे असाधारण रजा (विनावेतन) मंजूर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव पदनाम | नेमणुक | रुग्ण निवेदनाचा कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.शुभम वाघमारे, सफाई कामगार | पोलीस मुख्यालय | दि.२२/०२/२०२४ ते दि.१९/०३/२०२४ **एकुण २७ दिवस अर्जित रजा** दि.२०/०३/२०२४ ते दि.२८/०३/२०२४ **एकुण ०९ दिवस परिवर्तीत रजा** दि.२९/०३/२०२४ ते दि.०४/०४/२०२४ **एकुण ०७ दिवस, असाधारण (विनावेतन) रजा** |

**०२.पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुर/४९२०/२०२४ अमरावती शहर दिनांक २१/०५/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील ५० अन्वये **अर्जीत रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | अर्जीत रजा कालावधी | अतिरिक्त प्रभार |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. सुरेश अर्जुन दवणे, स्वीय सहायक | पोलीस आयुक्त, कार्यालय अमरावती शहर | दि.२७/०५/२०२४ ते दि.३१/०५/२०२४ पर्यंत **एकुण ०५ दिवस** रजेपुर्वी दि.२५/०५/२०२४ ते दि.२६/०५/२०२४ रजे नतंर दि.१/०६/२०२४ व दि.०२/०६/२०२४ शासकीय रजेला जोडुन मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह | श्रीमती अरुणा चोरपगार, लघुटंकलेखक |

**०३.पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुर/४९४४/२०२४ अमरावती शहर दिनांक २२/०५/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद प्रमुख लिपीक यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील ५० अन्वये **अर्जीत रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | अर्जीत रजा कालावधी | अतिरिक्त प्रभार |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती ज्योती चौधरी, प्रमुख लिपीक | विभागीय चौकशी शाखा | दि.२४/०५/२०२४ ते दि.२१/०६/२०२४ पर्यंत **एकुण २९ दिवस** रजेपुर्वी २३/५/२०२४ रजेनतंर दि.२२/०६/२०२४ व दि.२३/०६/२०२४ शासकीय रजेला जोडुन मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह | श्री. संजय सपकाळे, प्रमुख लिपीक |

**०४.पोआअ/पशा-३/मुख्या.सो.परवानगी/५०१५/२०२४ अमरावती शहर दिनांक २४/०५/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद अंगुली मुद्रा अधिकारी याचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे सदर कालावधीमध्ये शासकीय सुट्टीच्या दिवशी मुख्यालय सोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | कालावधी | अतिरिक्त प्रभार |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. सचिन सुरेश गागुर्डे, क. तज्ञ/सपोनि (अ.मु) | अंगुली मुद्रा शाखा, पो.आ.कार्य.अम.शहर | दि.२५/०५/२०२४ ते दि.२६/०५/२०२४ पर्यंत **एकुण ०२ दिवस** | श्री. ज्ञानेश्वर वावरकर, क. तज्ञ/सपोनि (अ.मु) |

**०५.पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुर/५०४/२०२४ अमरावती शहर दिनांक २७/०५/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील ५० अन्वये **अर्जीत रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | अर्जीत रजा कालावधी | अतिरिक्त प्रभार |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. अशिष बरोले, कनिष्ठ श्रेणी लिपीक आस्थापना शाखा | आस्थापना शाखा | दि.२७/०५/२०२४ ते दि.३०/०५/२०२४ पर्यंत **एकुण ०४ दिवस** | श्रीमती माधुरी किरणापुरे, कनिष्ठ श्रेणी लिपीक |

## भाग-२

## <u>शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे</u>

## <u>शिक्षा</u>

**०१.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोना-१३७१ कोहली + ९ /४७४०/२०२४ अमरावती शहर दि.१६/०५/२०२४**

**संदर्भ :-** १) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक १३५७/२०२३, दिनांक १८/०५/२०२३
२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस आदेश क्रमांक पोआअश/विचौ-२/कसुरी/परेड गैरहजर/नापोकॉ१३३६ बहादुरे +१६/८१३७/२०२३ अमरावती शहर दिनांक १७/०७/२०२३

**कसुरदारचे नाव :-** (१) नापोकॉ/१३७१ शैलेश कोहली, (२) मनापोकॉ/०९ वंदना नाथमोथे (पांडे),सर्व नेमणुक पो.स्टे.राजापेठ, (३) पोकॉ/११४२ पंकज आकोटकर, (४) मपोकॉ/१६२२ सुरेखा ढोके, सर्व नेमणुक पो.स्टे.गाडगे नगर, (५) पोकॉ/६७८ अमरदिप सोळंके, (६) पोकॉ/१८६७ शैलेश बेदरकर, सर्व नेमणुक पो.स्टे.वलगांव, (७)पोकॉ/७९९ मंगेश फोले, (८) मपोकॉ/१८७० शोभा बेलसरे,सर्व नेमणुक शहर वाहतुक शाखा (पुर्व), (९) नापोकॉ/७०५ अमोल सावरकर, (१०) पोकॉ/२५६ धिरज गजभिये, सर्व नेमणुक शहर वाहतुक शाखा (पश्चिम), अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही सर्व वरील पोलीस अंमलदार तुम्हाला तुमच्या नेमणुकीच्या ठिकाणाहुन दिनांक १२/०५/२०२३ रोजी च्या साप्ताहीक सिरोमोनियल परेड साठी रवाना करण्यात आले होते. तुम्ही दिनांक १२/०५/२०२३ रोजीच्या साप्ताहीक सिरोमोनियल परेडवर गैरहजर राहिल्याचे आढळुन आले आहे. तुमचे सदर कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुनतुम्ही कर्तव्यात हलगर्जीपणा/निष्काळजीपणा केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/- दंडाची शिक्षा का** करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.तरी तुम्ही तुमचे कारणे दाखवा नोटीसवर स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तुम्ही कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हा पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो.ता.प्रत/स्पष्टीकरण/नापोकॉ-१३७१ कोहली + ३०/१३३१०/२०२३, दिनांक २८/११/२०२३ अन्वये स्पष्टीकरण सादर करणे करीता एक संधी देण्यात येवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### <u>अंतिम आदेश</u>

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार <u>**"सक्त ताकीद"**</u>ही शिक्षा देण्यात येत आहे.

**०२.पोआअ/विचौ-२/अहवाल/गैरहजर कालावधी/पोशि-१७३४ पारडे/४९८२/२०२४ अमरावती शहर दि.२४/०५/२०२४**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार हे शहर वाहतुक शाखा (पुर्व), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन उजळणी कोर्स साठी पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे आले असता उजळणी कोर्स मधुन त्यांचे नवासमोर दर्शविल्याप्रमाणे गैरहजर राहिले असुन कसुरी अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला आहे. प्राप्त गैरहजर कसुरी अहवालाचे अवलोकन केले असुन कसुरीच्या अनुषंगाने तुम्हाला दिनांक १७/०५/२०२४ रोजी तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेण्यासाठी मा.पोलीस उपायुक्त (मुख्या), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही तुमचे म्हणणे मा.पोलीस उपायुक्त (मुख्या), अमरावती शहर यांचे समक्ष सांगीतले असुन, तुमचे म्हणणे ऐकुणघेवून सदरचा गैरहजर कालावधी हा प्रकृतीच्याकारणास्तव महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६१ चे तरतुदीनुसार **परावर्तीत रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व हुद्दा | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/१७३४ राजेंद्र पारडे | श.वा.शा. (पुर्व) | दिनांक ०८/१२/२०२३ पासुन ते दिनांक १६/०१/२०२४ पर्यत एकुण ४०दिवस उजळणी कोर्स गैरहजर राहिले. | दिनांक ०८/१२/२०२३ पासुन ते दिनांक १६/०१/२०२४ पर्यत एकुण ४० दिवस गैरहजर राहिले. | **एकुण ४० दिवस परावर्तीत रजा** |

## सेवानिवृत्त

**०१.पोआअ/आस्था-वेनिलि/सेनि आदेश/४८८०/२०२४ अमरावती शहर दि.२१/०५/२०२४**

संदर्भ :- या कार्यालयाचे अधीसुचना क्र.पोआअ/आस्था-वेनिलि/नि.व.सेवानिवृत्त/ ९३०२/२०२३, दि.११.०८.२०२३

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर, आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) आणि महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :- सेनिवे/१०९९/३४/सेवा-४, दिनांक ०२.०२.१९९९ अन्वये **दि.३१.०५.२०२४** चे मध्यान्होत्तर **पासून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात येत आहे**.

| अ. क्र. | अंमलदाराचे नाव | पदानाम व बक्कल क्रमांक | नेमणुक | जन्म दिनांक | वयाची ५८ वर्ष पुर्ण केल्याचा दिनांक | नियत वयोमान सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय महादेव पाचंगे | सपोउपनि/ ७६० | पो.स्टे. नागपुरी गेट | १२/०५/१९६६ | १२/०५/२०२४ | ३१/०५/२०२४ |
| २. | हेमंत सुखदेव वाकोडे | सपोउपनि/ १५०६ | पोलीस मुख्यालय | ०१/०६/१९६६ | ०१/०६/२०२४ | ३१/०५/२०२४ **नियम १० टिप १ नुसार** |
| ३. | अरुण रघुनाथ वाळसे | सपोउपनि/ ७८२ | पो.स्टे. कोतवाली | ०९/०५/१९६६ | ०९/०५/२०२४ | ३१/०५/२०२४ |
| ४. | दामोधर रामकृष्ण मिलखे | पोहवा/ ९९६ | पो.स्टे. नागपुरी गेट | १२/०५/१९६६ | १२/०५/२०२४ | ३१/०५/२०२४ |

१/- वरिल नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक ३१.०५.२०२४ चे मध्यान्होत्तर पासून प्रभारी पोलीस अधिकारी यांनी शासकिय सेवेतुन मुक्त करावे.

२/- प्रभारी पोलीस अधिकारी यांनी सदर पोलीस अंमलदार यांच्या ताब्यातील शासकिय निवासस्थाने त्वरीत रिक्त करण्याची कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३/- वरिल नमूद पोलीस अंमलदार यांना शासकिय सरंजाम,किट, ओळखपत्र पोलीस मुख्यालयातील वस्त्र भांडारमध्ये जमा करुन प्रभारी पोलीस अधिकारी यांनी तसे या कार्यालयास कळवावे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/प्रलि-आस्था/जुनी पेंशन योजना/४३५९/२०२४, अमरावती शहर दिनांक ०३/०५/२०२४**

**संदर्भ** - ०१.पोअलोना/आस्था/जुनी निवृत्ती वेतन योजना/१८६८/२०२४ नागपुर दि.१६/०४/२०२४

०२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण -२०२३/प्र.क्र./४६/सेवा-४ दिनांक ०२/०२/२०२४.

**विषय** - दि.०१.११.२००५ पुर्वी पदभरती जाहीरात/अधिसुचना निर्गमीत झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजु झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागु करणे बाबत.

--००--

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये दि.०१.११२००५ पुर्वी पदभरती जाहीरात/अधिसुचना निर्गमीत झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजु झालेल्या शासकीय अधिकारी /कर्मचारी यांना केंद्रशासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागु करणे बाबत निर्देश दिले आहे.

त्या अनुषंगाने खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या भरती दिनांकापासुन जुनी पेंशन योजना लागु करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | जाहीरात दिनांक | भरती प्रक्रीया दिनांक | निवड दिनांक | नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोना/१४३७ विनोद टेंभुणे | १४/०१/२००५ | ०७/०२/२००५ | ०३/०३/२००५ | ०१/०२/२००६ |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस